॥ विठ्ठला तू वेडा कुंभार ॥

गायकः सुधीर फडके
गीतः ग. दि. माडगुळकर
चित्रपटः तू वेडा कुंभार

फिरत्या चाकावरती देशी
मातीला आकार
विठ्ठला तू वेडा कुंभार ॥ धृ. ॥

माती पाणी उजेड वारा
तूच मिसळिशी सर्व पसारा
आभाळच मग ये आकारा
तुझ्या घटांच्या उतरंडीला
नसे अंत ना पार ॥ १ ॥

घटाघटांचे रूप आगळे
प्रत्येकाचे दैव वेगळे
तुझ्याविना ते कोणा नकळे
मुखी कुणाच्या पडते लोणी
कुणामुखी अंगार ॥ २ ॥

तूच घडविसी, तूच मोडिसी
कुरवाळिसी तू, तूच ताडिसी
नकळे यातून काय जोडिसी
देशी डोळे परी निर्मिशी
तया पुढे अंधार ॥ ३ ॥

Corrections : yogeshkulkarni@yahoo.com